| MHPU120009972023 | **नियमित दिवाणी दावा क्र.१४९/२०२३ मधील निशाणी क्रमांक १०६ खालील आदेश** (शिला प्रताप कोंडे–देशमुख व इतर विरुध्द सिंधुबाई प्रतापराव जगताप व इतर ) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे मनाई अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या कथनाप्रमाणे सदर दाव्यात वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीकरण्याकरीता अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज मंजूर होवून त्याप्रमाणे वादीने दाव्यात दुरुस्ती केलेली आहे. परंतू त्याप्रमाणे मनाई अर्जामध्ये दुरुस्ती करणे राहून गेलेले आहे. दाव्यातील दुरुस्तीप्रमाणे मनाई अर्जामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान संभवत नाही. याउलट प्रकरण गुणवत्तेवर निर्गमित करण्यास मदत होणार आहे. त्याप्रमाणे वादी यांनी प्रतिवादी क्र.३ व ४ यांची नावे मनाई अर्जात समाविष्ट करण्याकरीता व त्या अनुषंगाने इतर मजकूर मनाई अर्जात समाविष्ट करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्या म्हणण्याशिवाय प्रस्तुतचा अर्ज चालविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी नि.१०८ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे कायद्याप्रमाणे वादीस दावा व केवळ कैफियतीमध्ये दुरुस्ती करता येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा चालण्यास पात्र नाही. वादी हा मनाई अर्जामध्ये दुरुस्ती मागत आहे. परंतु मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अर्जामध्ये दुरुस्ती करता येत नाही. त्याचप्रमाणे दुरुस्तीद्वारे वादी हा नवीन

तथ्य व नवीन प्रार्थना समाविष्ट करु पाहत आहेत. सदरची दुरुस्ती ही मंजूर केल्यास त्यामुळे अर्जाचे मुळ स्वरुप पुर्णपणे बदलणार आहे. त्यामुळे कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार सदर दुरुस्ती मंजूर करता येत नाही.

**०४.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे नवीन घटनेबाबत वादीस नवीन दावा दाखल करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे केवळ त्या कारणास्तव वादीस दुरुस्ती मागता येणार नाही. अशा परिस्थितीत सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादी क्र.३ व ४ यांना तोशिष लागणार आहे. त्याचप्रमाणे दुरुस्तीद्वारे वादी हा पूर्वी राहिलेल्या उणीवा भरुन काढण्याचा प्रयत्न करत आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**०५.** वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनांशी सुसंगत असा युक्तिवाद केलेला आहे.

**०६.** प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ अर्जामध्ये बदल होणार आहे काय ? | **...नाही** |
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | **....होय** |
| ३. | काय आदेश ? | **...वादीचा अर्ज मंजूर करणेत आला.** |

**–<u>कारणमिमांसा</u>–**

**०७.** प्रस्तुत दावा, तसेच अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामुळे

सदर नियमात सांगितल्याप्रमाणे जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल व करण्यात येणारी दुरुस्ती ही पक्षकारातील वाद मिटवणेसाठी तसेच दावा गुणवत्तेवर निकाल होणेसाठी आवश्यक असेल तर सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास काही अडचण नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज हा वरील निकषान्वये निर्णित करणे आवश्यक आहे.

०८. सुरुवातीस हे नमूद करणे आवश्यक आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये वादी अथवा प्रतिवादी यांना त्यांच्या वादपत्रात अथवा कैफियतीमध्ये दुरुस्ती करता येते. परंतु प्रस्तुत अर्जाद्वारे वादी हा मनाई अर्जामध्ये दुरुस्ती मागत आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १४१ प्रमाणे दाव्याकरीता दिलेली तरतूद ही किरकोळ कारवाईस लागू आहे. त्याचप्रमाणे कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार केवळ अतितांत्रीक दृष्टीकोन अवलंबून अर्ज नामंजूर करता येत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादी यास प्रस्तुतचा अर्ज हा मागे घेवून मनाई अर्जाकरीता पुन्हा नव्याने अर्ज देता आला असता परंतु वादीने मुळ अर्जामध्येच दुरुस्ती मागितलेली आहे. त्यामुळे केवळ तांत्रीक दृष्टीकोन न अवलंबता न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज गुणवत्तेवर निर्गमित करणे योग्य होईल.

०९. वादी यांनी यापूर्वी वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता अर्ज दाखल केला होता. सदर दुरुस्तीचा अर्ज मंजूर झालेला आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ व ४ यांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे. वादी यांनी मुळ मनाईचा अर्ज हा दावा दाखल करताना दाखल केल्याने त्यामध्ये प्रतिवादी क्र.३ व ४ च्या बाबतीत कोणतीही कथने अथवा विनंती समाविष्ट नव्हती. परंतु दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.३ व ४ यांना समाविष्ट केल्याने त्यांच्या बाबतची कथने अर्जामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे वादीच्या प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन करता वादी केवळ प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या बाबतची कथने समाविष्ट करत आहे. तसेच सदरची कथने

ही यापूर्वीच मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. सामान्यतः मनाईचा अर्ज हा दाव्याचीच प्रतिकृती असतो. अशा परिस्थितीत दाव्यातील कथने मनाई अर्जात समाविष्ट केल्याने त्याचे स्वरुप बदलत आहे असे म्हणणे उचित होणार नाही. तसेच सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीस कोणतीही तोशिष लागत नाही. याउलट त्यांना जबाबाद्वारे त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी उपलब्ध आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणे उचित राहील. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारीत करतो.

**– आदेश –**

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी १०६) मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सदरची दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत विना विलंब करणेची आहे.

३. वादीने सदर अर्जाची दुरुस्ती प्रत द्यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.03.24 16:55:24 +0530

दिनांकः– २४.०३.२०२६ (एस.डी.शिरसाट)
ठिकाण –भोर . दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .